सत्यमेव जयते
# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, गडचिरोली
फोन नं 07132- 295473
जिल्हा परिषद हायस्कुल परिसर, चामोर्शी रोड
Email: dietgadchiroli@maa.ac.in
गडचिरोली 442605

**जा. क्र./ जिशिवप्रसं/गडची/आस्था/ /2025** **दिनांक. : / /2025**

**प्रति,**

1) मा.प्राचार्य,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,(सर्व)
2) प्रशासन अधिकारी, मनपा / नपा. (सर्व)

**विषय** :- कथाकथन स्पर्धा नियमावली सादर करणेबाबत.

**संदर्भ** :- 1) मा.संचालक,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट पुणे यांचे पत्र क्र.साव्यावि/राशैसंवप्रप/शिक्षक स्पर्धा/2025-26 दिनांक 10/10/2025

२) मा.संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट पुणे यांचे पत्र क्र.साव्यावि/राशैसंवप्रप/ शिक्षकस्पर्धा/2025-26 दिनांक 17/10/2025

३) मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट पुणे यांचे दि. २८/१०/२०२५ रोजीच्या Online बैठकीमधील सूचना.

उपरोक्त संदर्भिय विषयान्व्ये कळविण्यात येते की, राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणा-या सर्व शासकीय स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशत: अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, DIET मधील अधिकारी, कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृध्दिंगत करणे, त्यांच्यात समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजिटल, भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्दशाने केंद्र , तालुका विभाग व राज्यस्तरावर या विविध स्पर्धाचे आयोजन शैक्षणिक वर्ष 2025-26 पासून करण्यात येत आहे.

वरील ४३ स्पर्धांपैकी **कथाकथन स्पर्धेचे राज्यस्तरीय आयोजनाची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, गडचिरोली** यांचेकडे देण्यात आलेली आहे.

सदर कथाकथन स्पर्धेची नियमावली सादर करण्यात येत आहे.

# कथाकथन स्पर्धा नियमावली

## कथाकथन स्पर्धा नियम व अटी

१) कथाकथन स्पर्धा शालेय शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी असेल.

२) कथा स्वलिखित किंवा इतर लेखकांची अपेक्षित आहे. (इतर लेखकांची असल्यास मूळ लेखकाचे नाव व स्त्रोत स्पर्धेपुर्वी

जाहीर करणे बंधनकारक राहील.)

३) कथा सादरीकाराणासाठी ८ ते १० मिनिटांचा कालावधी राहील.

४) कथा जीवन कौशल्य. नैतिकमूल्य, गाभा घटक, संविधानिक मूल्य तसेच सामाजिक, शैक्षणिक व राष्ट्रीय उद्दिस्त यांना

अनुरूप असावी.

५) कथा व्यक्ती,समाज,लोकसमूह,व्यवसाय,श्रद्धा,विस्वास व उपासना पद्धती यांच्यावर टीका करणारी तसेच कोणाच्याही भावना दुखावणारी नसावी.

६) कथा मराठी, हिंदी, इंग्रजी भाषांतून सादर करण्यास परवानगी असेल.

७) परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

८) पहिली व दुसरी, तिसरी ते पाचवी, सहावी ते आठवी, नववी ते बारावी या स्तरांसाठी व त्यापुढील वयोगटासाठी खुला स्तर अशा पाच स्तरांतील वयोगटाच्या श्रोत्यांकारीता कथाकथन करणे अपेक्षित असून तसा स्पस्त उल्लेख सादरीकाराणापूर्वी स्पर्धकांनी करणे आवश्यक आहे.

9) कथाकथन स्पर्धा केंद्रस्तर, तालुकास्तर, विभागस्तर व राज्यस्तर अशी असेल.

१०) प्रत्येक स्तरावरील प्रथम क्रमांकाचा स्पर्धक त्याच्या पुढील स्तरावर सहभागी होईल.

११) कथाकथन स्पर्धेतील केंद्रस्तरावर केवळ प्रथम क्रमांक तसेच तालुका स्तर व त्यापुढील प्रत्येक स्तरावरील प्रथम, द्वितीय आणि तृतीय स्पर्धकांना पारितोषिक म्हणून निश्चित रक्कम, प्रमाणपत्र व सन्मानचिन्हे दिले जाईल.

## कथाकथन स्पर्धेचे निकष

| अ.क्र. | कथाकथन स्पर्धा मूल्यमापन निकष | गुण |
|---|---|---|
| १ | कथेची निवड व आशय | १० |
| २ | आत्मविश्वास | १० |
| ३ | आवाजातील चढ उतार | १० |
| ४ | अभिनय | १० |
| ५ | आशयानुरूप भाषेचा वापर | १० |
| ६ | कथनशैली | १० |
| ७ | कथेतील सुसूत्रता | १० |
| ८ | प्रेक्षकांचा प्रतिसाद | १० |
| 9 | कथेचा एकूण प्रभाव | २० |
| | एकूण | १०० |

(बळीराम चौरे)
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
गडचिरोली .